सकाळ

# 'डिजिटलायझेशन'ने रुंदावल्या ज्ञानाच्या कक्षा

## डिजिटल तज्ज्ञ अमित शर्मा; सोनई महाविद्यालयात रंगला 'यिन टॉक'

सकाळ वृत्तसेवा

**नगर, ता. २७ : ''शिक्षक तीस वर्षांपूर्वी, काय वाचावे हे शिकवायचे. आता, कसे शिकावे हे शिकवले जाते. ज्ञानाच्या कक्षा रुंदावल्या आहेत. आपण स्वतःला डिजिटल समजतो. मात्र, 'डिजिटलायझेशन'चा उपयोग जास्तीत जास्त चांगला कसा होईल, हे पाहणे महत्त्वाचे ठरते,'' असे मत डिजिटल तज्ज्ञ अमित शर्मा यांनी व्यक्त केले.**



सोनई : मुळा एज्युकेशन सोसायटीच्या येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात आयोजित 'यिन टॉक' कार्यक्रमास उपस्थित विद्यार्थी. (छायाचित्र : दत्ता इंगळे)

सोनई (ता. नेवासे) येथील मुळा एज्युकेशन सोसायटीच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात आयोजित 'सकाळ'च्या 'यिन टॉक' कार्यक्रमात 'व्हर्च्युअल रिॲलिटी इन डिजिटल स्पेस' या विषयावर ते बोलत होते.

या वेळच्या 'यिन टॉक'ची थीम 'डिजिटल थिंकिंग' ही होती. शॉर्ट फिल्म दिग्दर्शक आणि लेखक ध्रुव सेहगल, डिजिटलच्या माध्यमातून सामाजिक क्षेत्र बदलू पाहणारे दीपेश टांक यांचीही व्याख्याने झाली. 'सकाळ'चे कार्यकारी संपादक ॲड. डॉ. बाळ ज. बोठे पाटील, उपप्राचार्य डॉ. अशोक तुवर, प्रा. ज्ञानदेव झिने आदी व्यासपीठावर होते.

YIN. TALK

या तीन तास रंगलेल्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी व्याख्यात्यांशी प्रश्नोत्तररूपी संवाद साधत डिजिटल विश्वाची सफर अनुभवली. चीनने तयार केलेला 'चँग चाऊ' हा डिजिटल न्यूज अँकर, कोरियाने २०१४मध्ये बेसबॉल सामन्यात दाखविलेला 'डिजिटल ड्रॅगन' आदींची चित्रफीत दाखवून शर्मा यांनी डिजिटल क्षेत्रातील प्रगती स्पष्ट केली.

सेहगल यांनी पुस्तके, रेडिओ, दूरदर्शन, मोबाईलपासून सध्याचा 'डिजिटल पॉवर'चा प्रवास विशद केला. नेटफ्लिक्स, यू-ट्यूबचा प्लॅटफॉर्म व्यक्त होण्यासाठी किती महत्त्वाचा ठरतो, हे त्यांनी समजावून सांगितले. दिल्लीतील 'निर्भया' प्रकरणाने व्यथित झाल्यानंतर आपण, डिजिटल तंत्रज्ञानाची मदत घेऊन महिलांची छेड काढणाऱ्यांविरोधात कसा लढा दिला, हे टांक यांनी सांगितले.

प्रास्ताविकात डॉ. बोठे पाटील यांनी 'सकाळ'च्या विविध उपक्रमांची माहिती देऊन 'यिन टॉक'चा हेतू विशद केला.

प्रा. प्रसाद बेडेकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. तुवर यांनी आभार मानले.



लोकांना काय आवडते, त्यांना काय हवे आहे, या प्रश्नांची उत्तरे शोधत होतो. 'सोशल'साठी अद्यापही सेन्सॉरशिप नसल्याने शॉर्टफिल्मद्वारे वाटेल तसे व वाटेल तेथे व्यक्त होता येते. आहात तसे राहिलात तरच समाज कळतो.
- ध्रुव सेहगल, दिग्दर्शक आणि लेखक



डिजिटलची मदत घेऊन, आपण जास्तीत जास्त चांगले कसे जगू शकतो हे पाहावे. आपण वाचून १० टक्के, बघून ३० टक्के आणि प्रत्यक्ष अनुभवातून ६० टक्के ज्ञान आत्मसात करत असतो.
- राकेश शर्मा, व्हर्च्युअल रिॲलिटी तज्ज्ञ



एखाद्या देशाला शिवी देऊन देशप्रेम दाखविता येत नसते. जबाबदारीची समज म्हणजे देशप्रेम. 'वॉर अगेन्स्ट रेल्वे राऊडी' ग्रुपच्या माध्यमातून, रेल्वे प्लॅटफॉर्मवर छेडछाड करणाऱ्या १८० जणांना मी पोलिसांच्या हवाली केले.
- दीपेश टांक, डिजिटल थिंकर

या कार्यक्रमाचे 'फेसबुक लाइव्ह' पाहा :
httpps://www.facebook.com/YINforchange

Nagar, NagarSouth
28/08/2019 Page No. 1